# आझाद अली शाह कॅम्पसमध्ये वार्षिक क्रिडा स्पर्धा उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आझाद अली शाह शिक्षण संस्था खडकेश्वर द्वारे संचलित शायनिंग स्टार मराठी व इंग्रजी प्राथमिक शाळा आणि एम.जी.एम वस्तानवी उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेत मोठ्या उत्साहात आनंदमय वातावरणात ' वार्षिक क्रीडा स्पर्धांचे ' आयोजन करण्यात आले, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष एम.जी.एम कॉलेज बीएमसीजे चे डॉ. प्रो. शेख शाहेद होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक ऑटोमॅटिक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे असिस्टंट जनरल मॅनेजर विनय पनियार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सानिया मोटर्सचे मॅनेजिंग डायरेक्टर मेहेर सचिन मुळे, औरंगाबाद एम आय एमचे जेष्ठ नेते नासिर सिद्दिकी, नगरसेवक

तथा रहेबर उर्दू डेली वर्तमानपत्राचे संपादक जमीर अहमद खादरी, चेतन राजपूत हे होते, यासोबत यावेळी शायनिंग स्टार शाळेचे.चे मु.अ. साजिद पाशा, एम.जी.एम. वस्तानवी शाळेच्या मु.अ. अमरीन खान व शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व अनेक पालक उपस्थित होते. आलेल्या सर्व पाहुण्यांचा परिचय करून पाहुण्यांना शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आले तद्नंतर कार्यक्रमाचे उद्घाटक यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून वेगवेगळ्या क्रिडा स्पर्धांचे उद्घाटन रितसरपने करण्यात आले. १०० मिटर धावने, रिले रनिंग, निंबु चमचा शर्यत, बोर्ड बॅलंसिंग, गोनपाट शर्यत, पुश अप्स आशा वेगवेगळ्या मैदानी खेळ गटात गटात घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपली पुर्ण कस लावत विजय होण्यासाठी आतोनात प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

त्यानंतर शाळेचे मु.अ. साजिद पाशा यांनी आपल्या मनोगतामध्ये आलेल्या सर्व पाहुण्यांचे कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल आभार व्यक्त करुन शाळेकडून होत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती दिली. विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पराजीत झालेल्या विद्यार्थ्यांना खेचुन न जाता पुन्हा प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. त्यानंर अध्यक्षीय भाषणात विनय पनियार यांनी विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थेच्या पदाधिक्यांचे कौतुक केले व आज या चिमुकल्यांना खेळतांना बघुन आपले बालपण आठवल्याचे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख आरीफ यांनी केले तर यांनी आभार प्रदर्शन वैष्णवी देहाडे यांनी केले. मदिहा फातेमा, शुभांगी कुलकर्णी, बुरहाना पठाण, फौजिया शेख, सुमैया शेख, धनश्री खिल्लारे, भक्ती बाळुबेटाळसे, शेख निदा, सैय्यद सोनम, शेख निलोफर ,सैयद सादिया, शेख जिनत, आशा ढोकणे, सलमा खाला , नफीसा खाला, शेख आरीफ आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. राष्ट्रगिता नंतर विद्यार्थ्यांना व पालकांना स्वादिष्ट जेवण देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# पुण्याचे माजी पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता अडचणीत

पुणे : पुण्याचे माजी पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून त्यांची चौकशी करण्यात आली होती. अमिताभ गुप्ता यांच्या संपत्तीची गुप्त चौकशी एसीबीकडून पूर्ण झाली आहे.

गुप्त चौकशीनंतर त्यांच्या उघड चौकशीची परवानगी एसीबीच्या महासंचालकांकडे मागण्यात आली आहे. गुप्त चौकशीत तथ्य आढळल्यानंतर उघड चौकशीची परवानगी मागण्यात आली आहे. गुप्ता यांच्या विरोधात माहिती आधिकार कार्यकर्ते सुधीर आल्हाट यांनी तक्रार दाखल केली होती.

अमिताभ गुप्ता हे अपर पोलीस महासंचालक दर्जाचे वरीष्ठ आयपीएस आधिकारी होते. अशा उच्चपदस्थ अधिकाऱ्याची एसीबीकडून चौकशी होण्याची पहिलीच वेळ आहे.

गुप्ता यांचा पुण्यातील मनोरा टाऊनशिपमधील स्वीट वॉटर विला प्रकल्पात आलिशान विला. विलाची किंमत २५ कोटी असल्याचा आल्हाट यांचा दावा आहे. मुंबईतील सांताक्रुझ येथे अमिताभ गुप्ता यांचा आलिशान फ्लॅट आहे. या फ्लॅटची किंमत २२ कोटी रुपये असल्याचे आल्हाट याचे म्हणणे आहे.

# लोकसभा- विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कार्याबद्दल श्रीकांत वाघुले यांचा गौरव



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लोकसभा आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल शिक्षक श्रीकांत अनिल वाघुले यांचा सन्मान करण्यात आला आहे. वैजापूर-११२ विधानसभा मतदारसंघातील भगूर (२३९) मतदान केंद्राचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून त्यांनी निवडणूक प्रक्रियेत उल्लेखनीय योगदान दिले.

२६ जानेवारीला वैजापूर येथे हा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरुण जराड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुनील सावंत, गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर, तसेच वरिष्ठ विस्ताराधिकारी मनीष दिवेकर आणि बाळासाहेब म्हस्के यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यांच्या या कार्याबद्दल प्रशासन व स्थानिक अधिकाऱ्यांकडून विशेष कौतुक करण्यात आले आहे. वाघुले तालुक्यातील भगूर गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक पदावर कार्यरत आहेत. फोटो कॅप्शन - सत्कार सोहळ्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# तथागत गौतम बुद्धांच्या विरोधात वादग्रस्त विधान; संस्थाचालकावर अखेर गुन्हा दाखल

**दिनेश दे. परदेशी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्मॉल वंडर स्कुल, बोहरानगर वाळुज (छत्रपती संभाजीनगर) या शाळेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. योगेश प्रमोदकुमार बोहरा यांनी २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी प्रजाकसत्ताक दिनानिमित्ताने स्मॉल वंडर स्कुल, बोहरानगर वाळुज या शाळेत आपण फारच तत्वज्ञानी तसेच जास्त हुशार असल्याचा आव आणत तथागत गौतम बुद्धांच्या विरोधात आक्षेपार्ह तसेच समाजा समाजामध्ये तेढ निर्माण करणारे वादग्रस्त वक्तव्य बोहरा यांनी केले.

तसेच आपल्या बुद्धीचा परिचय ॲड. योगेश प्रमोदकुमार बोहरा यांनी करून दिला. यावरून त्यांची बुद्धी किती संकुचित वृत्तीची आहे हे यावरून दिसून येते. ज्या विद्यार्थ्यांना महापुरूषांच्या छान छान गोष्टी सांगून त्यांचे भविष्य कसे उज्वल होईल हे सांगायचे सोडून इतर व्यक्तींच्या जपान दौऱ्याच्या गोष्टी सांगून काय सिद्ध करायचे होते. त्यांच्या या सर्व प्रकाराचा सबळ पुरावा देखील असल्याचे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी सांगितले. झालेल्या सर्व प्रकाराची माहिती वाळूज पोलिसांना देण्यात आली. यावरून ॲड. योगेश प्रमोदकुमार बोहरा यांच्यावर वाळूज पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वाळूज पोलिसांत गुन्हा दाखल करण्यासाठी राहुल वडमारे व त्यांचे सहकारी दाखल झाले होते.

**काय म्हणाले होते ॲड. योगेश बोहरा**

स्मॉल वंडर स्कुल, बोहरानगर वाळुज या शाळेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. योगेश प्रमोदकुमारजी बोहरा यांनी दि. २६//०१/२०२५ रोजी सकाळी प्रजाकसत्ताक दिना निमित्ताने स्मॉल वंडर स्कुल, बोहरानगर वाळुज याशाळेत असलेल्या कार्यक्रमात त्यांनी केलेल्या भाषणात 'नोबेल पुरस्कार सन्मानीत विश्वकवी रविन्द्र नाथ ठाकुर हे जपान चे प्रवासात असताना तेथील एका विद्यालयातील कार्यक्रमात प्रश्न विचारला की, तुम्ही कोणत्या धर्माला मानता त्याव मुलांनी उत्तर दिले बौध्द धर्म त्यावर त्यांनी मुलांना विचारले बौध्द धर्मचे महात्मा बुध्द हे भारतात जन्मले आहेत. हे तुम्हाला माहीती आहे का? त्यावर तेथील मुलांनी सांगितले की, हो आम्हाला माहीत आहे. त्यानंतर रविन्द्रनाथ ठाकुर यांनी मुलांना प्रश्न विचारला की, जर महात्मा बुध्द हे सेनेचे प्रमुख बनुन तुमच्या जपान देशावर आक्रमण करीत असतील तर तुम्ही काय करणार त्यावर मुलांनी उत्तर दिले की, आम्ही बुध्दाचा सामना करुन भगवान बुध्दाच्या मुर्त्या वितळून त्याच्या गोळ्या बनवुन त्यांच्यावर गोळ्या झाडू असे उदाहरण भाषणा दरम्यान दिले आहे. सदर भाषणाचा व्हीडीओ राहुल वडमारे तसेच आमच्याकडे प्राप्त झाला त्यावर तो व्हीडीओ पाहीला असता त्यावरुन योगेश बोहरा यांची मानसिकता ही मनु विचारसरणीची व धार्मीक भावणा दुखावतील अशी दिसुन येते. भगवान गौतम बुध्द हे शांतीचे प्रतीक असून प्रजाकसत्ताक दिनाच्या दिवशी त्यांनी आपल्या भाषणात देशभक्तीपर हुतात्मा, स्वातंत्र्य सैनिक यांचे उदाहरण देणे आपेक्षीत होते परंतु त्यांनी वर नमुद उदाहरण देवुन त्यांनी बौध्द धर्मीयांच्या भावणा दुखावल्या आहेत. तरी त्यांचेवर कारवाई क्रमप्राप्त होते. परिणामी त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

ॲड. योगेश प्रमोदकुमार बोहरा यांची बाजू जाणून घेण्यासाठी दैनिक 'अट्टल संकेत'च्या प्रतिनिधीने संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क होवू शकला नाही. त्यामुळे त्यांची बाजू समजू शकली नाही.

## 'त्या' शाळेचा परवाना रद्द करा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची मागणी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त वाळूज परिसरातील स्मॉल वंडर स्कूल बोहरा नगर वाळूज येथील संस्थाचालक एडवोकेट योगेश बोहरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तथागत गौतम बुद्धांच्या बाबत वादग्रस्त विधान केले असून हे विधान म्हणजे दोन समाजात तेढ निर्माण करणारे असून तथागत गौतम बुद्धांच्या बाबतीत अवमान कारक आहेत ही माहिती ज्या वेळेस जिल्हाध्यक्ष राहुल वाडमारे यांना मिळाल्यानंतर लगेच त्यांनी वाळूज पोलीस स्टेशन गाठून घटनेची माहिती संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना देऊन कारवाईची मागणी केली पण काल २६ जानेवारी गणतंत्र दिन असल्याकारणाने काही पोलिस अधिकारी कर्मचारी सुट्टीवर होते व विषय सामाजिक असल्याकारणाने व वक्तव्य हे तथागत गौतम बुद्धाच्या विरोधात असल्याकारणाने पोलीस प्रशासनाने जिल्हाध्यक्ष यांच्याशी चर्चा करून एक दिवस थांबून आम्ही या घटनेची चौकशी करतो आपण उद्या गुन्हा नोंदवा असे सांगितले. त्यानंतर आज दिनांक २७ जानेवारी रोजी जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे हे वाळूज पोलीस स्टेशन येथे सर्व पुराव्यासहित हजर होऊन गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली पोलीस निरीक्षक यांच्याशी चर्चा होऊन आज संबंधित संस्थाचालक बोहरा यांच्यावर दोन समाजात तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्या कारणाने कलम २९९ बी एन एस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून लवकरच या प्रकरणी आम्ही कारवाई करणार असल्याचेही पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले जर येत्या आठ दिवसात या संस्था चालकावर कारवाई होऊन त्यास योग्य ती शिक्षा न दिल्यास आठ दिवसानंतर शाळेसमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांनी पत्रकार यांच्याशी बोलताना सांगितले आहे.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष- राहुल वडमारे, जिल्हा सचिव -बापूसाहेब चाबुकस्वार, जिल्हा उपाध्यक्ष -संजय चव्हाण, वाळुज महानगराध्यक्ष -महादेव मस्के, विद्यार्थी नेते बाळू गायकवाड, डॉ. संदीप राणे, एकनाथ तीरमिले, विकास तायडे, मनोज पगारे, अंबादास वाघ आदींची उपस्थिती होती.

# निस्पृह विधितज्ज्ञ घडविण्यासाठी उत्तम विधी महाविद्यालयांची नितांत गरज - मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लोकशाही व्यवस्थेमध्ये कायद्याचे राज्य या संकल्पनेला सर्वोच्च स्थान आहे. न्यायव्यवस्था हा सर्वात महत्त्वाचा लोकशाहीचा स्तंभ म्हणून आपण पाहतो. आजही नागरिकांचा सर्वाधिक विश्वास हा न्यायव्यवस्थेवर आहे. हा विश्वास कायम ठेवण्यासाठी उत्तम वकील आवश्यक आहेत. उत्तम वकील तयार करण्यासाठी चांगली विधी महाविद्यालये व अनुभवी गुरुजन वर्गाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या शताब्दी समारोहाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कुलगुरू डॉ प्रशांत बोकारे, न्यायमूर्ती व्ही एस सिरपूरकर, प्राचार्य डॉ रविशंकर मोर, रजिस्ट्रार डॉ राजू हिवसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नागरिकांना लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी कटिबध्द-आयुक्त जी श्रीकांत

## महानगरपालिकेच्या वतीने प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शहरातील नागरिकांना लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी आपण नेहमी कटिबध्द आहोत असे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमावेळी मार्गदर्शन करताना केले.

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने मनपा मुख्यालय येथे भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य ध्वजारोहणआयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, संतोष वाहुळे,मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे,शहर अभियंता ए.बी देशमुख,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ पारस मंडलेचा, उप संचालक नगर रचना मनोज गर्जे,उप आयुक्त सविता सोनवणे,अपर्णा थेटे, राहुल सूर्यवंशी,अंकुश पांढरे, विजय पाटील , लखीचंद चव्हाण,विभाग प्रमुख,अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.



यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयुक्त महोदय म्हणाले की, आपण सर्व जण नागरिकांना दर्जेदार सेवा व लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी नेहमी कटिबध्द आहोत.या करिता सर्व अधिकारी कर्मचारी यांचे सहकार्य महत्वाचे आहे. या पुढे पाणी वाया जाणार नाही त्याचा अपव्यय टाळण्यासाठी नळांना स्मार्ट मिटर बसविण्यात येणार आहे.या वर्षी होणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अंतर्गत आपल्या शहराचा चांगल्यात चांगला क्रमांक कसा लागेल याकडे आपले प्रयत्न राहतील. आपले नामांकन अधिक उंचीवर नेण्यासाठी सर्व अधिकारी कर्मचारी व नागरिक यांचा सहभाग आवश्यक आहे.

तसेच ज्या भागात ड्रेनेज लाईन नाही,ज्या ठिकाणी सेफ्टी टँक आहे त्या ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकून सर्व शहर सेफ्टी टँक मुक्त शहर करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.याचे काम प्रगतीपथावर आहे.

त्यांनी यावेळी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या आराखडाचा सुद्धा उल्लेख केला.ते म्हणाले की आपल्याला या अनुषंगाने सातसुत्री कार्यक्रमावर काम करायचे आहे. याची सुरुवात देखील झाली आहे.मां. मुख्यमंत्री महोदय याचा आढावा घेणार आहे यावेळी आपले शहर प्रथम क्रमांकावर असेल याची मला खात्री आहे असे ते म्हणाले. तसेच नवीन वर्षात जुन्या गोष्टी टाकून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ई प्रणाली कडे आपण वाटचाल करत आहोत.मनपाचे अधिकारी कर्मचारी यांना प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला पगार होत आहे.या प्रमाणेच आउट सोर्सिंग कर्मचारी यांचा पगार सुध्दा एक तारखेला होण्यासाठी हजेरी अॅप चा अवलंब करण्यात येत आहे.लवकरच हा प्रश्नही मार्गी लागेल यात काही शंका नाही असे ते म्हणाले.

यावेळी मनपा शालेय विद्यार्थ्यांनी लेझिम सादर करून उपस्थितांचे मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सांस्कृतिक कार्य अधिकारी शंभू विश्वासू यांनी केले. मुख्याध्यापक संजीव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रियदर्शनी शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले. या नंतर मा.आयुक्त महोदयांनी टप्पा क्र.०३ येथे सुरू करण्यात आलेल्या मालमत्ता कर वॉर रूम मित्र कक्षातील कामाचा आढावा घेतला.या कक्षातून या अगोदर कर्मचारी मार्फत मालमत्ता कर थकबाकी दारांना कॉल करण्यात येत होते.आता यात अजून जास्तीत जास्त थकबाकी दारांना कॉल करणे सोपे होण्यासाठी नवीन सॉफ्टवेअर द्वारे ऑटो कॉलिंग होणार आहे.यामुळे दररोज जवळपास ५०० ते ६०० मालमत्ता कर थकबाकीदारांना कॉल करणे सोपे होणार आहे.यामुळे मालमत्ता कर वसुली भर पडणार आहे असे यावेळी आयुक्त म्हणाले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.
• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816
This Daily Printed, Published and Owned by RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003
• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816